गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ●अंक २०६ वा ● शनिवार १६ डिसेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 206 | Date : 16/12/2023 | blow :Saturday | Page 4 | Price 4


## आमदार अपात्रता प्रकरण, अध्यक्ष राहुल नार्वेकर १० जानेवारीला निकाल देणार



नवी दिल्ली : महाराष्ट्रातील शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणात निकाल देण्यासाठी १० जानेवारीपर्यंतची मुदतवाढ विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना सर्वोच्च न्यायालयाने दिली आहे. आमदार अपात्रता प्रकरणातील ठाकरे गटाने विधानसभा अध्यक्षांविरोधात दाखल केलेल्या प्रकरणात शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात एक महत्वाची सुनावणी पार पडली. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने ३१ डिसेंबर पर्यंत शिवसेना आमदारांच्या अपात्रतेवर निर्णय करण्याचे निर्देश विधानसभा अध्यक्षांना दिले होते. शुक्रवारी झालेल्या सुनावणीत सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी विधानसभा अध्यक्षांना जास्तीचा वेळ लागेल असं सर्वोच्च न्यायालयाला सांगितलं. सर्वोच्च न्यायालयाने १० जानेवारी २०२४ पर्यंतची मुदतवाढ विधानसभा अध्यक्षांना दिली आहे.

**अखेर निकाल लागणार?**

साधारणतः दीड वर्षांहून जास्त काळ महाराष्ट्रात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे विरुद्ध उद्धव ठाकरे यांच्यात सुरू असलेला आमदार अपात्रतेचा वाद आगामी वर्षाच्या सुरुवातीला निकाली निघणार अशी चिन्ह दिसू लागली आहेत. त्यामागे दोन मुख्य कारणे आहेत:

१. विधानसभा अध्यक्षांच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी २० डिसेंबर पर्यंत आम्ही प्रक्रिया संपवून निकाल राखून ठेवणार आहोत, असे आश्र्वासन सर्वोच्च न्यायालयात दिले आहे.

२. निकाल राखून ठेवल्यानंतर आतापर्यंत दोन्ही बाजूंच्या आमदारांनी सादर केलेली जवळपास २ लाख ७१ हजार कागदपत्रे, सुनावणीतील दस्तावेज याचा अभ्यास करून निर्णय करण्यासाठी अध्यक्षांनी सर्वोच्च न्यायालयाकडून वेळ मागून घेतला आहे. त्यामुळे शक्यता आहे की विधानसभा अध्यक्षांना न्यायालयाकडून मिळालेल्या मुदतवाढीत निर्णय होऊ शकतो.

जर १० जानेवारी २०२४ पर्यंत निकाल देणे शक्य नाही झाले तर, विधानसभा अध्यक्षांना सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेल्या वेळेत जर निकाल देणे शक्य नसेल तर सर्वोच्च न्यायालयात पुन्हा एकदा अर्ज करून मुदत वाढवून मागितली जाऊ शकते. अशावेळी सर्वोच्च न्यायालयाने तयारी दर्शवली तर निर्णय करण्यासाठी पुन्हा एकदा मुदतवाढ दिली जाऊ शकते.

अध्यक्षांविरोधात अविश्वासदर्शक ठराव आला तर,सध्या महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणी जवळपास दररोज सकाळ -संध्याकाळ सुनावणी घेत आहेत. पण विधानसभा अध्यक्षांच्या विरोधात जर अविश्र्वासदर्शक ठराव आला किंवा फक्त नोटीस जरी आली तरीही संबंधित विधानसभा अध्यक्ष नबाम रेबिया खटल्यातील निकालानुसार आमदार । **पान २ वर**

## शेतकऱ्यांन फटका बसणार; सोलापूर बाजार समितीत १५०० गाड्यांची आवक



सोलापूर/प्रतिनिधीः सध्या राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडले आहेत. कारण, कांद्याच्या दरात सातत्यानं घसरण होत आहे. सरकरनं कांद्याच्या निर्यातीवर बंद घातल्यानंतर कांद्याचे दर घसरले आहेत. या मुद्यावरुन शेतकरी आक्रमक झाले आहेत. दरम्यान, अशातच सोलापूरच्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणात कांद्याची आवक झाली आहे. बाजार समितीत सुमारे १२०० ते १५०० गाडी कांद्याची आवक झाली आहे. या वाढलेल्या आवकेमुळं दरात आणखी घसरण होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

सोलापूरच्या कृषी उत्पन्न बाजार समितीत सुमारे १२०० ते १५०० गाडी कांद्याची आवाक झाली आहे. अद्यापही अनेक गाड्या रांगेत थांबून आहेत. त्यामुळं आज । **पान २ वर**

## ३५० कोटींशी माझा अथवा काँग्रेसचा संबंध नाही,

### आयटी छापेमारीनंतर धीरज साहूंची पहिली प्रतिक्रिया



नवी दिल्ली : काँग्रेसचे राज्यसभा खासदार धीरज प्रसाद साहू यांच्या विविध ठिकाणी गेल्या आठव्यात आयकर खात्याने छापेमारी केली. या छापेमारीमध्ये धीरज साहू यांच्याकडे ३५० कोटी रुपये असल्याचे उघड झाले. धीरज साहू यांच्याकडील पैसे मोजण्यासाठी दोन ते तीन दिवस लागले. नोटा मोजायला मशीनही कमी पडल्या होत्या. यावर सत्ताधारी भाजपने काँग्रेसवर निशाणा साधला. पण आता या प्रकरणाबाबत धीरज साहू यांनी प्रतिक्रिया दिली आहे. हे पैशासोबत माझा अथवा काँग्रेसचा संबंध नसल्याचं साहू यांनी सांगितलेय.

खासदार धीरज साहू यांनी आयकर विभागाच्या (IT) छाप्याबाबत एएनआय या वृत्तसंस्थेला प्रतिक्रिया दिली. यामध्ये त्यांनी सत्ताधाऱ्यांचे आरोप फेटाळले. ते म्हणाले की, जप्त करण्यात आलेल्या । **पान २ वर**

## पुणे गारठणार! १८ डिसेंबरपासून तापमानात आणखी घट होण्याची शक्यता

पुणे: गेल्या आठवडाभरापासून पुण्यातील तापमानात सातत्याने घट होत असून १८ डिसेंबरपासून तापमानात (थशरींहशी) आणखी घट होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. गेल्या तीन ते चार दिवसांपासून शहरात आकाश निरभ्र असल्याने तापमानात बदल झाल्याची नोंद आयएमडीच्या शास्त्रज्ञांनी केली आहे. त्यामुळे येत्या काही दिवसात पुणेकरांना गुलाबी थंडी अनुभवता येणार आहे.


दरम्यान, गुरुवारी शहरात मोसमातील सर्वात कमी किमान तापमानाची नोंद झाली असून शिवाजीनगर येथे तापमान १४ अंश सेल्सिअस होते. १० डिसेंबररोजी सरासरीपेक्षा ४ अंश सेल्सिअस ने अधिक । **पान २ वर**

## शैक्षणिक शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर व धाराशिव या जिल्हयातील महाविद्यालयीन स्तरावर शिक्षण घेत असलेल्या अनुसचित जमातीच्या विदयार्थ्यांसाठी सन २०२३-२४ शैक्षणिक वर्षासाठी शिष्यवृत्ती अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली असल्याचे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी बळवंत गायकवाड यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग, अंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प सोलापूर अधिनस्त असलेल्या सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील अनुसचित जमातीच्या विदयार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना, अनुसूचित जमातीच्या विदयार्थ्यांना शिक्षण व परीक्षा शुल्क (फ्रिशीप) शिष्यवृत्ती योजना, राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्था मधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीची योजनेसाठी सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी शिष्यवृत्ती अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचा अर्ज परिपूर्ण व मूळ कागदपत्रासह भरण्यासाठी खाली दिलेल्या संकेत स्थळाला भेट द्यावी, असे आवाहन प्रकल्प अधिकारी गायकवाड यांनी केले आहे. संकेतस्थळ - https://mahadbt.maharashtra.gov.in

## मकरंद पाटील लवकरच मंत्रिपदाची शपथ घेणार, अजित पवारांचे संकेत



मुंबई : राज्यातील शिंदे-फडणवीस-अजित पवार सरकारमध्ये आणखी एकदा मंत्रिमंडळ विस्तार होण्याची चिन्हं आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रिमंडळ विस्ताराचे संकेत दिले आहेत. गणेशोत्सव, दसरा, दिवाळी असे मंत्रिमंडळ विस्ताराचे कथित मुहूर्त याआधीच हुकले आहेत. त्यानंतर आता पुन्हा हिवाळी अधिवेशनानंतरमंत्रिमंडळ विस्तार होईल, असे वारे वाहात आहेत. याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना विचारण्यात आलं.


अजित पवार यांच्या शेजारी साताऱ्याचे आमदार मकरंद पाटील बसले होते. त्यावेळी तुमच्या शेजारी बसलेल्या आमदारांचा शपथविधी कधी होणार, असा प्रश्र्न एबीपी माझाच्या प्रतिनिधींनी अजित पवारांना विचारला. त्यावर अजित पवार म्हणाले, लवकरच ते मंत्रिपदाची शपथ घेतील.

मकरंद पाटील हे साताऱ्यातील वाई खंडाळा विधानसभा मतदारसंघाचे । **पान २ वर**

## छत्तीसगड सीमेवर पोलीस-नक्षल्यांत एक तास गोळीबार


गडचिरोली : महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरील धानोरा तालुक्यातील बोधी टोलाजवळ झालेल्या पोलीस आणि नक्षलवाद्यांच्या चकमकीत दोन नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यास गडचिरोली पोलिसांना यश आले आहे. विशेष बाब म्हणजे या चकमकीत मोस्ट वाँटेड असलेला जहाल नक्षलवादी दुर्गेश वट्टी याचा देखील खात्मा करण्यात आला आहे. चार वर्षांपूर्वी जांभूळखेडा येथे स्फोट घडवून नक्षल्यांनी १५ पोलीस जवानांना ठार केले होते. या घटने मागे मुख्य सूत्रधार असलेल्या कसनसूर दलमचा उप-कमांडर दुर्गेश वट्टीची ओळख पटली आहे. या घटनेमुळे नक्षलवाद्यांचे धाबे दणाणले आहेत. या परीसरत पोलीस अधिक तपास करत असून नक्षलवाद्यांच्या तळाचा शोध गडचिरोली पोलीस घेत आहे.

## संसद प्रकरणातील मुख्य आरोपी पोलिसांच्या ताब्यात, मास्टरमाईंट 'ललित झा' याला ७ दिवसांची पोलीस कोठडी



नवी दिल्ली : बुधवार १३ डिसेंबर रोजी संसदेत घुसखोरीचा कथित सूत्रधार ललित झा याला चौकशीसाठी सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. पोलिसांनी त्याची १५ दिवसांची कोठडी मागितली होती. उल्लंघन केल्यापासून फरार असलेल्या झा याने गुरुवार रात्री दिल्लीत पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले. बिहारचा असलेला ललित झा कोलकाता येथे शिक्षक म्हणून काम करत होता, अशी माहिती पोलिसांनी दिली.

याप्रकरणात आतापर्यंत पाच पुरुष आणि एका महिलेवर दहशतवादविरोधी कडक कायद्यांअतर्गत आणि भारतीय । **पान २ वर**



## मुंबईत महालक्ष्मी रेसकोर्सवर आज आंतरराष्ट्रीय धम्मपरिषदेचे आयोजन

### महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा संकल्प पूर्ण करण्यासाठी आज धम्मपरिषदेस रेसकोर्स मैदानावर मोठ्या संख्येने उपस्थित राहावे : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे आवाहन



मुंबई/विजय घनघाव : मुंबईत महालक्ष्मी रेसकोर्स मैदानात उद्या दि. १६ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजता आंतरराष्ट्रीय बौध्द धम्मपरिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. विश्र्वशांतीचा संदेश देणा-या या बौध्द धम्म परिषदेस जागतिक बौध्द धम्मगुरु दलाई लामा उपस्थित राहणार आहेत. महामानव डॉं. बाबासाहेब आंबेडकरांचा संकल्प पूर्ण करण्यासाठी आज शनिवारी दि.१६ डिसेंबर रोजी महालक्ष्मी रेसकोर्स मैदानात लाखोंच्या संख्येने बौध्द आंबेडकरी जनतेने उपस्थित राहावे असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी आज केले.डॉं.बाबासाहेब आंबेडकर धम्मदिक्षा समारोह समितीचे अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले हे असुन कार्याध्यक्ष भदंत डॉं.राहुलबोधी महाथेरो; सरचिटणीस अविनाश कांबळे; खजिनदार पद्मश्री कल्पना सरोज आहेत. तसेच धम्म चळवळीतील अनेक मान्यवर या समितीचे सदस्य आहेत.

महामानव डॉं.बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोंबर १९५६ रोजी भारतात ऐतिहासीक धम्मचक्र प्रवर्तन केले. महामानव डॉं. बाबासाहेब आंबेडकरांनी घेतलेल्या धम्मदिक्षेमुळे भारतात बौध्द धम्माचे पुर्नजीवन झाले. १४ ऑक्टोंबर १९५६ रोजी नागपुर येथे महामानव डॉं. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लाखो अनुयांयासह बौध्द धम्माची दीक्षा घेतली. त्यावेळी त्यांनी दुसरा धम्मदीक्षेचा कार्यक्रम मुंबईत १६डिसेंबर १९५६ रोजी महालक्ष्मी रेसकोर्स मैदानात आयोजित करण्याचा संकल्प जाहीर केला होता. मात्र त्यापूर्वीच ६ डिसेंबर १९५६ रोजी महामानव डॉं. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झाले.त्यामुळे मुंबईत महालक्ष्मी रेसकोर्सवर बौद्ध धम्मदीक्षा कार्यक्रम आयोजित करण्याचे त्यांचे स्वप्न अधुरे राहिले. महामानव डॉं.बाबासाहेब आंबेडकरांचा अधुरा राहिलेला संकल्प पूर्ण करण्यासाठी उद्या दि.१६ डिसेंबर २०२३ रोजी दुपारी ४ वाजता मुंबईत महालक्ष्मी रेसकोर्स मैदानात आंतरराष्ट्रीय बौध्द धम्मपरिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. डॉं. बाबासाहेब आंबेडकरांचा संकल्प पूर्ण करण्यासाठी सर्व आंबेडकरी । **पान २ वर**

# संपादकीय

## तर बारमाही एसटी महामंडळ..

यंदाच्या दिवाळीच्या १६ नोव्हेंबर रोजी या एका दिवसात ३५ कोटी १८ लाखांचे विक्रमी उत्पन्न मिळवून एक अनोखा विक्रम केला आहे. असे म्हटले जाते की, ७५ वर्षांच्या इतिहासातील एका दिवसात मिळवलेल्या सर्वाधिक उत्पन्नापैकी हे सर्वाधिक उत्पन्न आहे. हे सर्व आपली पाठ थोपटून घेणारे असले तरी त्याच्या दुसऱ्या बाजूचाही विचार करणे हे आवश्यक ठरते. राज्यात कोणत्याही घडामोडी घडल्या की त्याचा परिणाम हा इथे एसटीवर होतो. ग्रामीण भागात तर एसटी हा प्रवाशांचा महत्त्वाचा स्रोत आहे. राज्यातील ग्रामीण भागात तर एसटीशिवाय पर्यायच नाही. पण गेली कित्येक वर्षे या एसटीवर संकट ओढवल्याचे पाहायला मिळाले. विशेषत: कोरोना काळ व नंतर तर महाभयंकर परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र, त्यातूनही यंदाची दिवाळी एसटीसाठी खास आहे. दिवाळीच्या सुटीत प्रवासासाठी होणारी गर्दी लक्षात घेत उत्पन्न वाढीसाठी एसटीने हंगामी भाडेवाढ लागू केली. ज्या सामाजिक घटकांना एसटी भाड्यामध्ये सवलत देते त्यांना देखील भाडेवाढ लागू केली. गेल्यावर्षी एसटीने दिवाळीसाठी दहा दिवसांची भाडेवाढ लागू केली होती, ती यंदाच्या वर्षी चक्क वीस दिवस भाडेवाढ लागू केली गेली. एसटी महामंडळात दररोज साधारण बारा लाख लीटर डिझेल लागते. त्यामुळे डिझेलवर होणारा खर्च फार मोठा असतो. हकीम आयोगाच्या सूत्रानुसार खर्चात ज्याप्रमाणे वाढ होईल त्या प्रमाणात परिवहन महामंडळाने एसटीच्या भाड्यात वाढ करणे आवश्यक ठरते. परंतु, डिझेलच्या दरात वाढ झाली की ती वाढ टायर व बसच्या वाढलेल्या दराच्या नावाखाली एसटी हकीम आयोगाचा हवाला देऊन वाढीव खर्चापेक्षा फार मोठ्या प्रमाणात भाडेवाढ करत असते. त्यामुळे एसटी करत असलेली ही भाडेवाढ कधीही डिझेलच्या सूत्रानुसार होत नाही. डिझेलची एक रुपयाची दरवाढ झालेली असताना महामंडळ दहा ते वीस टक्क्यांची दरवाढ करते. आतापर्यंत केलेली दरवाढ याच सूत्रानुसार झालेली आहे. मात्र, डिझेलच्या दरात मोठ्या प्रमाणात कपात झाल्यानंतरही एसटी महामंडळाने कोणतेही भाडे कपात केली नाही. गणपती उत्सवात, होळी उत्सवात जर एसटीने अशी दरवाढ सुरू केली तर एसटी व खासगी बस गाड्यांमध्ये फरक काय राहणार आहे? त्यापेक्षा एसटी महामंडळाने आपल्या कारभारात सुधारणा करून प्रवासी टिकवला, तर बारमाही एसटी महामंडळ फायद्यात राहील, यात नक्कीच शंका नाही.

# महाराष्ट्र शाखेच्या राष्ट्रकुल संसदीय मंडळाचा सुवर्णमहोत्सवी अभ्यासवर्ग

नागपूर येथे होणाऱ्या राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या कालावधीत राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेच्या विद्यमाने सन १९६४ पासून दरवर्षी 'राज्यशास्त्र व लोकप्रशासन' या विषयांचा अभ्यास करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी 'संसदीय कार्यप्रणाली व प्रथा' या विषयांबाबत एक संसदीय अभ्यासवर्ग आयोजित करण्यात येतो. या वर्षी आयोजित करण्यात येत असलेला हा ५० वा संसदीय अभ्यासवर्ग आहे. या अभ्यास वर्गाच्या माध्यमातून संसदीय शासन प्रणालीची विद्यार्थ्यांना जवळून ओळख करुन दिली जाते.

राष्ट्रकुल संसदीय मंडळाची स्थापना सन १९११ मध्ये 'एम्पायर पार्लमेंटरी असोसिएशन' या नावाने प्रथम इंग्लंडमध्ये झाली. सुरुवातीला या मंडळाचे ऑस्ट्रेलिया, कॅनडा, न्यू फाऊंडलंड, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका व युनायटेड किंग्डम हे देश सदस्य होते. या मंडळाने १९४८ मध्ये राष्ट्रकुल संसदीय मंडळ' असे नाव बदलून त्याप्रमाणे आपल्या घटनेमध्ये दुरुस्ती केली. या संस्थेचे मुख्य कार्यालय लंडन – युनायटेड किंगडम येथे आहे. संसदीय मंडळ आज राष्ट्रीय, राज्य, प्रांतिक, प्रादेशिक स्वरुपात राष्ट्रकुलातील एकूण ५४ देशांतील १८० शाखांमध्ये कार्यरत असून या मंडळाचे जवळ – जवळ १७ हजारांपेक्षा जास्त संसद, विधानमंडळ सदस्य सभासद आहेत. दरवर्षी मार्च महिन्यातील दुसऱ्या सोमवारी शाळा, महाविद्यालय, शासकीय कार्यालय व संसद इत्यादी ठिकाणी विविध उपक्रम / चर्चासत्राच्या माध्यमातून राष्ट्रकुल दिन (Commonwealth Day) साजरा करण्यात येतो.

**अभ्यासवर्गाची पार्श्वभूमी**

या मंडळामध्ये विकसित तसेच अविकसित राष्ट्रे, विविध धर्म, भाषा, विभिन्न संस्कृती असलेली राष्ट्रे सभासद आहेत. ही संस्था म्हणजे शांतता, समृद्धी, प्रतिष्ठा, समता, व्यक्ती स्वातंत्र्य, कायदा व सुव्यवस्था तसेच प्रत्येक राष्ट्राच्या समाजजीवनात आवश्यक असलेल्या निष्ठा इत्यादी बाबतीत सर्व राष्ट्रांना एकत्रित बांधून ठेवणारा महत्त्वाचा दुवा आहे. 'संयुक्त राष्ट्र संघ' (UNO) व 'अलिप्त राष्ट्र संघ' (NAM) या खालोखाल 'राष्ट्रकुल संसदीय संघटना' (CPA) ही एक मोठी सर्वात जुनी जागतिक राष्ट्र संघटना म्हणून ओळखली जाते. या संस्थेचे सभासदत्व स्वीकारलेल्या राष्ट्रांनी केवळ शासकीय स्तरावरच नव्हे, तर अशासकीय स्तरावरील सदस्य राष्ट्रांच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक जिव्हाळ्याच्या समस्यांवर विचारविनिमय करून परस्पर सहकार्य करण्याचे धोरण अंगिकारले आहे. संसदीय शासन प्रणालीमध्ये संसदीय शासन अधिक समृद्ध व बळकट करुन सर्वसामान्य जनतेमध्ये संसदीय शासन पद्धतीबाबत जागृती, प्रेम आणि आदर निर्माण करण्यासाठी विविध उपक्रमांद्वारे प्रयत्न करणे, परस्परांतील विविध संसदीय प्रथांचा, पद्धतीचा अभ्यास करून प्रत्येक राष्ट्राला आपापली संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक समृध्द करण्यास प्रवृत्त करणे, संसद सदस्यांची कर्तव्ये त्यांचे अधिकार व जबाबदारी ह्यामध्ये येणाऱ्या अडचणींच्या संदर्भात विविध विषयांवर विचारांची देवाण – घेवाण हे कार्य देखील या मंडळामार्फत केले जाते. सभासद राष्ट्रांच्या पीठासीन अधिकाऱ्यांच्या होणाऱ्या परिषदा, परिसंवाद, चर्चा, भेटी इत्यादी विविध उपक्रमांद्वारे सदस्य राष्ट्रांच्या संसदीय प्रथा, प्रणाली याबाबत विचारविनिमय करुन यामध्ये सुधारणा करण्यासाठी चालना दिली जाते. त्यामुळे संसदीय लोकशाही अधिक प्रबळ व समृध्द करण्यास मदत होत आहे.

**महाराष्ट्राचा पुढाकार** राष्ट्रकुल संसदीय मंडळाची राज्य पातळीवर शाखा स्थापन करुन त्याद्वारे उपयुक्त उपक्रम राबविणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य आहे. तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी १५ जुलै, १९५२ रोजी महाराष्ट्र शाखेच्या स्थापनेचा ठराव सभागृहात मांडला व सभागृहाने तो १८ जुलै, १९५२ रोजी संमत केला. तेंव्हापासून राष्ट्रकुल संसदीय मंडळाची, महाराष्ट्र शाखा आपल्या राज्यात कार्यरत आहे.

नागपूर येथे दरवर्षी होणाऱ्या अभ्यास वर्गाच्या माध्यमातून संसदीय शासन प्रणालीची विद्यार्थ्यांना जवळून ओळख करुन दिली जाते. त्यासाठी संसदीय शासन प्रणालीशी ज्यांचा निकट संबंध आला आहे व ती बळकट करण्यासाठी ज्या नामवंतांचा हातभार लागत आहे.

अशा नामवंत संसदपटू व मान्यवरांची व्याख्याने आयोजित करुन त्यांचा लाभ अभ्यासवर्गामध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना करून दिला जातो. याचबरोबर वृत्तपत्र क्षेत्रातील दिग्गज तसेच रुळलेल्या वाटेवरून न जाता स्वतः नव्याने निर्माण केलेल्या मार्गाने समाजासाठी ज्यांनी आपले आयुष्य वेचले आहे, अशा मान्यवरांची सुद्धा व्याख्याने आयोजित करून त्यांच्या समृद्ध अनुभवाचा लाभ व्याख्यानांद्वारे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविला जातो. भारतातील संसदीय लोकशाही कशा पध्दतीने कार्यरत आहे, कार्यकारी मंडळावर विधानमंडळामार्फत कशाप्रकारे नियंत्रण ठेवले जाते, त्यासाठी कोणकोणत्या संसदीय आयुधांचा वापर केला जातो, अर्थसंकल्पीय प्रक्रिया, विधिमंडळाची समिती पद्धती, कायदा तयार करण्याची प्रक्रिया इत्यादी बाबतची प्रत्यक्ष माहिती नामांकित संसदपटू व तज्ज्ञांच्या व्याख्यानांमधून तसेच सभागृहाच्या प्रत्यक्ष कामकाजाच्या अवलोकनद्वारे विद्यार्थ्यांना मिळत असते.

राष्ट्रकुल संसदीय मंडळ व संसदीय अभ्यासवर्गामध्ये देशातील संसदीय लोकशाही प्रणालीचा अभ्यास असणाऱ्या मान्यवर तज्ज्ञ वक्त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. राष्ट्रकुल संसदीय मंडळातर्फे विधानसभा व विधानपरिषदेतील सदस्यांसाठी संसदीय अभ्यासवर्गाचे आयोजन व परदेश अभ्यासदौरे याचे आयोजन केले जाते. आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये सहभाग घेतला जातो. उत्कृष्ट संसदपटू व उत्कृष्ट भाषण पुरस्कार देऊन विधिमंडळ सदस्यांना गौरविण्यात येते.

**सुवर्ण महोत्सवी अभ्यासवर्ग** यंदाच्या ५० व्या अभ्यासवर्गाचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सोमवारी, ११ डिसेंबर २०२३ ला झाले. तर विधानसभेचे अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार,विधानपरिषदेचे विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे, विधान सभेचे विरोधीपक्षनेते विजय वडेट्टीवार, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत दादा पाटील, विधानसभा सदस्य बाळासाहेब थोरात, प्रणिती शिंदे, विधान परिषद सदस्य अभिजित वंजारी, विधानमंडळ सचिवालयाचे सचिव जितेंद्र भोळे, विधानमंडळ सचिवालयाचे सचिव विलास आठवले इ. तज्ज्ञ मान्यवरांचे अभ्यासवर्गाला मार्गदर्शन होणार आहे. राज्यातील १२ विद्यापीठांतील सुमारे १०० विद्यार्थी व अधिव्याख्याते सहभागी होणार आहेत. विधानमंडळाच्या यु ट्यूब चॅनल वरुन तसेच माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या समाजमाध्यमाद्वारे या व्याख्यानांच्या प्रसारणाचा लाभ जगभरातील प्रेक्षकांना घेता येत आहे.

राष्ट्रकुल संसदीय संघाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी आणि संसदीय लोकशाही प्रणाली अधिक प्रभावशाली करण्यासाठी महाराष्ट्र शाखा यापुढेही विविध प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन करीत राहील.

**संकलन : दतात्रय कोकरे,**

विभागीय संपर्क अधिकारी,नागपूर शिबिर कार्यालय, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय.

पान १ वरुन

## मुंबईत महालक्ष्मी रेसकोर्सवर आज..

जनतेने आणि बौध्द अनुयायांनी येत्या १६ डिसेंबर २०२३ रोजी दुपारी ४ वाजता महालक्ष्मी रेसकोर्स मैदानात उपस्थित राहावे असे आवाहन ना. रामदास आठवले यांनी केले आहे.

जगात आज दहशतवाद, आतंकवाद, नक्षलवाद असा हिंसाचाराचा प्रादुर्भाव वाढत आहे. अनेक ठिकाणी बॉम्बस्फोट आणि हिंसाचार होत आहे. शांतता भंग होत आहे. हमास आणि इस्त्रायलचे युध्द सुरु आहे. अनेक लोकांचे लहान बालकांचे त्यामध्ये जीव जात आहेत. हा हिंसाचार रोखला गेला पाहिजे. जगात शांततेची गरज आहे. जगात पुन्हा शांतता स्थापन करण्यासाठी; जगाला मानवतेचा विचार देण्यासाठी ; भगवान बुध्दांनी दिलेल्या धम्माची; त्यांनी दिलेल्या अहिंसा, शांती, बंधुता, मैत्री या विचारांची गरज आहे. मानवतेचा विचार भगवान बुध्दांनी दिला आहे. विश्र्वशांतीसाठी जगाला युध्द नव्हे तर बुध्दांची गरज आहे. हा संदेश देण्यासाठी उद्या १६ डिसेंबर २०२३ रोजी दुपारी ४ वाजता महालक्ष्मी रेसकोर्स मैदानात विश्र्वशांतीसाठी जागतिक बौध्द धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या धम्मपरिषदेस लाखोंच्या संख्येने लोक उपस्थित राहतील असा विश्र्वास ना.रामदास आठवले यांनी व्यक्त केला.

## ३५० कोटींशी माझा अथवा

पैशांमध्ये काँग्रेस किंवा अन्य कोणत्याही विरोधी पक्षाचा पैसा नाही. या प्रकरणी विनाकारण बदनामी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्या पैशाशी माझा काहीही संबंध नाही, असे धीरज साहू यांनी सांगितले. हा माझ्या कुटुंबाचा पैसा आहे. आमचं कुटुंब खूप मोठं आहे, त्यामुळे हा पैसा त्यांचाच आहे. हा पैसा बेकायदेशीर असल्याचे अद्याप प्राप्तिकराकडून सांगण्यात आलेले नाही. अशा स्थितीत या पैशाबाबत काहीही सांगणे घाईचे ठरेल, असे साहू म्हणाले.

आयकर विभागाने धीरज साहू यांच्या रांची येथील निवासस्थानावर त्यांच्या कुटुंबाच्या मालकीच्या ओडिशातील दारू कंपनीविरुद्ध कारवाईचा एक भाग म्हणून छापा टाकला होता. ज्या ठिकाणी आयटीने छापा टाकला ते साहू यांचे संयुक्त कुटुंब निवासस्थान आहे. यामध्ये ३५० कोटींहून अधिक रक्कम वसूल केली आहे.

धीरज साहू म्हणाले की, आज जे काही घडत आहे ते अतिशय दु:ख देणारे आहे. जप्त केलेले पैसे माझ्या फर्मचे आहेत, हे मी मान्य करू शकतो. जी रोकड जप्त करण्यात आली, ती माझ्या दारू फर्मची आहे. ते पैसे माझे नाहीत, माझ्या कुटुंबाचे आणि इतर संबंधित कंपन्याचे आहेत. खढ ने नुकताच छापा टाकला आहे. मी सर्व गोष्टींचा हिशेब देईन.

धीरज साहू यांच्या झारखंड, ओढिशा आणि पश्र्िचम बंगाल येथील नऊ ठिकाणी आयकर विभागाच्या अधिकाऱ्याने छापेमारी केली. तेथे कपाटभरुन नोटा जप्त केल्या. २८० कर्मचाऱ्यांचे पथक आठवडाभर या नोटा मोजत होते. नोटा मोजणारी मशीनही बंद पडली होती. धीरज साहू यांच्याकडून तब्बल २५३ कोटींपेक्षा अधिक रक्कम जप्त केल्याची माहिती मिळाली. या प्रकरणानंतर भाजपने काँग्रेसवर हल्लाबोल केला. पंतप्रधान मोदींपासून सर्वांनीच काँग्रेसवर निशाणा साधला.

## पुणे गारठणार! १८ डिसेंबरपासून ..

असलेले शहराचे किमान तापमान १४ डिसेंबरपर्यंत२ अंश सेल्सिअसने घटले आहे. त्याचप्रमाणे १२ ते १४ डिसेंबर दरम्यान कमाल तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअसने घट झाली. १२ डिसेंबरला कमाल तापमान ३१.४ अंश सेल्सिअस होते, तर १४ डिसेंबरला ते २८.८ अंश सेल्सिअसपर्यंत खाली आले.

१०डिसेंबर रोजी शिवाजीनगर येथे किमान तापमान १५.३ अंश सेल्सिअस होते. मात्र, १२ डिसेंबरपासून तापमानात हळूहळू घट होत असून, १४ डिसेंबरला तापमानात सरासरीपेक्षा २अंश सेल्सिअसने घट झाली असून, शहरात तापमानाची नोंद झाली आहे. तापमानातील घसरणीचा हा ट्रेंड पुढील काही दिवस शहरात कायम राहण्याची शक्यता आहे.'सध्या राज्यात आकाश निरभ्र अनुभवायला मिळत आहे. मात्र दक्षिण–आग्नेय द्वीपकल्पातून काही प्रमाणात आर्द्रता येत असल्याने आर्द्रतेत वाढ होत आहे. त्यामुळे पुढील ४८ तास तापमान सध्याच्या पातळीवरच राहणार आहे. १८ डिसेंबरपासून राज्यात उत्तरेकडील थंड वाऱ्यांचा प्रभाव जाणवण्याची शक्यता असून या वेळी तापमानात आणखी २ अंशांची घट होण्याची शक्यता आहे. पुणे शहरातही तापमानात घट होणार आहे, असं हवामान खात्यानं सांगितलं आहे.

## संसद प्रकरणातील मुख्य आरोपी..

दंड संहितेच्या इतर कलमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. लोकसभेत घुसखोरी करणाऱ्या चौघांवर यूएपीए अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. लोकसभेत पकडले गेलेले सागर शर्मा आणि डी मनोरंजन आणि संसदेबाहेर अटक करण्यात आलेले नीलम देवी आणि अमोल शिंदे यांची सविस्तर चौकशी करावी लागेल, अशी माहिती दिल्ली पोलिसांनी दिली. दरम्यान आता ललित झा याला देखील सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

## मकरंद पाटील लवकरच मंत्रिपदाची

आमदार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीवेळी ते शरद पवारांसोबत दिसले होते. शरद पवारांच्या सातारा दौऱ्यात ते पवारांच्या गाडीतून प्रवास करताना दिसले. मात्र नंतर ते अजित पवार यांच्या गटात दाखल झाले.

अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली त्यावेळी मकरंद पाटील उपस्थित होते. मात्र, त्यानंतर शरद पवार यांच्या कराड दौऱ्यावेळी आपण शरद पवार यांच्यासोबत आहे असं त्यांनी सांगितलं होतं. पण नंतर काहीच दिवसांनी मकरंद पाटील हे अजित पवार यांच्या भेटीसाठी देवगिरी निवासस्थानी उपस्थित राहिले होते. कार्यकर्त्यांसह भेटीसाठी दाखल झालेल्या मकरंद पाटील यांनी अजित पवारांना पाठिंबा दिला होता.

## शेतकऱ्यांन फटका बसणार;

सकाळी दहा वाजता सुरु होणारे कांद्याचे लिलाव दुपारी दोन वाजता करण्याचा निर्णय व्यापाऱ्यांनी घेतला आहे. तर उद्या शनिवारी बाजार बंद ठेवण्याचा निर्णय बाजार समितीनं घेतला आहे. तर रविवारी साप्ताहिक सुट्टी असल्यानं सलग दोन दिवस बाजार समिती बंद राहणार आहे. आधीच निर्यातबंदीमुळं सोलापूरच्या बाजारात कांद्याचे दर निम्म्याहून अधिक घसरले होते. त्यातच वाढलेल्या आवकेमुळं दरात आणखी घसरण होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. दरम्यान, सोलापूर बाजार समितीच्या नियोजनाच्या अभावामुळं शेतकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जातेय.

यंदा राज्यात अपेक्षित पाऊस झाला नाही. त्यामुळं शेतकरी संकटात सापडला आहे. अशातच उरल्यासुरल्या पिकांचे अवकाळी पावसामुळे नुकसान झाले आहे. त्यात शेतकऱ्यांनी कसेबसे कांद्याच्या पिकाला जगवलं आहे. मात्र, केंद्र सरकारने कांदा निर्यात बंदी करण्याचा निर्णय घेतल्याने कांद्याला कमी भाव मिळत आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे राज्यभरातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये संताप पाहायला मिळला. एकीकडे अवकाळी आणि गारपिटीनं बळीराजा होरपळला आहे. शेतकऱ्याला हिवाळी अधिवेशना दरम्यान आर्थिक मदत होईल आणि दिलासा मिळेल अशी आशा होती. मात्र, केंद्र सरकारच्या या निर्णयाने शेतकरी वर्गात पुन्हा नाराजी पसरली आहे. अनेक ठिकाणी कांदा उत्पादक शेतकऱ्यांची आंदोलनं सुरु आहेत. दरम्यान, केंद्र सरकार लवकरच कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी सकारात्मक निर्णय घेईल,असे आश्र्वासन मंत्री पियुष गोयल यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना दिले आहे. त्यामुळं आता यावर तोडगा निघणार का? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

## आमदार अपात्रता प्रकरण,..

अपात्रतेविषयीचा निर्णय करू शकत नाहीत. सर्वोच्च न्यायालयाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विरुद्ध उद्धव ठाकरे यांच्या खटल्यातील निकालात नबाम रेबिया प्रकरणातील निकाल अवैध ठरवलेला नाही, तर पाचपेक्षा जास्त न्यायाधीशांच्या न्यायपीठाने त्यावर निर्णय करावा असे निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे नबाम रेबीया प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अविश्र्वासदर्शक ठरावाची नोटीस आमदारांच्या वतीने अध्यक्षांच्या कार्यालयाला देण्यात आली तर अध्यक्षांना आमदारांच्या अपात्रतेवर निर्णय करण्याचे अधिकार नसतात.

पिठासीन अधिकारी म्हणजेच विधानसभा अध्यक्ष बदलले गेले तर, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार आमदार अपात्रतेवर निर्णय करताना विधानसभा अध्यक्ष लवाद म्हणजेच 'ढीळर्ली–परश्र' च्या भूमिकेत असतात त्यामुळे ते सर्वोच्च न्यायालयाला उत्तरदायी असतात. परंतु लवाद किंवा ढीळर्लीपरश्र चे अध्यक्ष / अधिकारी यांना एक ठरवून दिलेली कालमर्यादा असते. अपवादात्मक परिस्थितीशिवाय लवाद किंवा ढीळर्लीपरश्र चे अधिकारी निकाल राखून ठेवल्यावर बदलले गेले किंवा जर त्यांच्याकडून पदभार काढून घेण्यात आला तर नव्या अधिकाऱ्याला संपूर्ण प्रकरणावर पुन्हा सुनावणी घ्यावी लागते. तशीच नियम – परंपरा विधानसभा अध्यक्षांना लागू होते.

विधानसभा अध्यक्षांनी राजीनामा दिला तर, आमदार अपात्रता प्रकरणावरील सुनावणी म्हणजे कायद्याच्या भाषेत अर्ध – न्यायिक प्रक्रिया आहे. ज्यावेळी विधानसभा अध्यक्ष राजीनामा देतात त्यावेळी त्यांच्यासमोर सुरू असलेली अर्ध–न्यायिक प्रक्रियाही शून्यवत होऊ शकते. कारण न्यायालयातील न्यायाधीश जर राखून ठेवलेला निकाल देण्यापूर्वी निवृत्त झाले किंवा त्यांच्यावर महाभियोग चालवला गेला तर नव्याने त्यांच्या जागेवर पदभार स्वीकारणाऱ्या न्यायाधिशांना सगळी सुनावणी नव्याने घ्यावी लागते, सर्व युक्तिवाद, उलटतपासणी ऐकावी लागते आणि नंतरच निकाल दिला जातो.

सध्याच्या परिस्थितीत शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणाबाबत अशा असंख्य विविध कायदेशीर शक्यता जरी असल्या तरीही हा अधिकार सर्वस्वी विधानसभा अध्यक्षांचा असतो. विविध कायदेशीर शक्यता विचारत घेणे हा केवळ विचार– विमर्ष विस्ताराचा एक प्रयोग. याबाबतचे अधिकार आणि निर्णय निर्विवादपणे महाराष्ट्राचे विधानसभा अध्यक्ष यांच्याच कार्यकक्षेचा विषय आहे.

## काशी बनतयं पर्यटन केंद्र, वार्षिक उलाढाल २०,००० कोटींच्या पुढे; अर्थव्यवस्था मजबूत होण्यास मदत

काशी : काशीचे नाव येताच तुमच्या मनात पहिला विचार येतो तो बाबा विश्र्वनाथांचा. पण गेल्या दोन वर्षांत काशीमध्ये बरेच काही बदल झाले आहेत. या बदलांचा परिणाम बनारसच्या अर्थव्यवस्थेवर दिसून येत आहे. काशी विश्र्वनाथ कॉरिडॉर सुरु होऊन दोन वर्षे झाली आहेत. या दोन वर्षांत काशीतील पर्यटकांची संख्या १३ कोटींच्या पुढे गेली आहे.काशीत वार्षिक उलाढाल २०,००० कोटींच्या पुढे गेली आहे. काशीमध्य विमानतळापासून रेल्वे आणि रोडवेपर्यंत पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात वेगाने बदल होत आहेत.

तज्ज्ञांच्या मते काशी हे पर्यटन केंद्र म्हणून वेगाने प्रगती करत आहे. आकडेवारीनुसार, २०२२ मध्ये सुमारे ४.५ कोटी पर्यटकांनी काशीला भेट दिली होती. यावर्षी ही संख्या ५ कोटींच्या पुढे जाईल, तर धर्मशाळा आणि हॉटेलच्या खोल्या देखील सामान्यतः रिकाम्या राहणार नाहीत.एकट्या बनारसमध्ये फक्त १००० नोंदणीकृत हॉटेल्स आहेत.

काशी विश्र्वनाथ धामने बनारसच्या अर्थव्यवस्थेला नवी गती दिली आहे. या धाममुळं सरकारच्या महसुलात ६५ टक्क्यांची जोरदार वाढ नोंदवण्यात आली आहे. टुरिझम वेल्फेअर असोसिएशनच्या आकडेवारीनुसार, गेल्या वर्षी येथील वार्षिक उलाढाल सुमारे २५० कोटी रुपये होती, ती यंदा ३०० ते ३५० कोटी रुपयांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. काशीच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीसह, कारागीर, हॉटेल क्षेत्र, लाकूडकाम, पर्यटन यांसारख्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात लोकांना रोजगार मिळत आहे. त्याचबरोबर बनारसी साडीच्या व्यवसायातही झपाट्याने वाढ होताना दिसत आहे.

आणखी एक काशी विश्र्वनाथ धाम पर्यटन केंद्र म्हणून उदयास आले आहे. त्याचवेळी, काशी विश्र्वनाथ कॉरिडॉरच्या निर्मितीमुळे बनारसच्या अर्थव्यवस्थेलाही चालना मिळाली आहे. येथील पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा झाल्यामुळे पर्यटकांच्या संख्येत मोठी वाढ नोंदवण्यात आली आहे. गेल्या ९ वर्षांत पर्यटकांच्या संख्येत सुमारे १० पटीने वाढ झाली आहे. या वाढीचा फायदा येथील व्यावसायिकांनाही झाला. त्यामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळाली आहे. केवळ कॉरिडॉरमध्ये येणाऱ्या पर्यटकांमुळे अर्थव्यवस्थेला वर्षाला ८ ते १० हजार कोटी रुपयांचा वाटा मिळत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आसलेल्या खंडोबारायाचे नळदुर्ग येथील मैलारपुरात आगमन

## थंडीची तमा न बाळगता नळदुर्ग येथील भक्तानी केले खंडोबारायाचे जोरदार स्वागत

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे :नळदुर्ग येथे पावणेदोन महिन्याच्या वास्तव्यासाठी श्री खंडोबा देवाचे दि.१४ डिसेंबर रोजी भल्या पहाटे नळदुर्ग (मैलारपुर) येथील खंडोबा मंदिरात आगमन झाले. श्री खंडोबा देवाचे नळदुर्ग शहरात आगमन होताच थंडीची तमा न बाळगता नळदुर्ग शहर वासियांनी देवाचे जोरदार स्वागत केले. यावेळी खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी नागरीकांनी मोठी गर्दी केली होती.



सालाबादाप्रमाणे याही वर्षी नळदुर्ग आणि अणदुरच्या मानकऱ्यांमध्ये लेखी करार झाल्यानंतर श्री खंडोबा देवस्थान ट्रस्टच्या वतीने दोन्हीकडील मानकऱ्यांचा मानपान करण्यात आला. यानंतर अणदुर येथील

मंदीरातुन श्री खंडोबा देवाचे पालखीतुन नळदुर्गकडे मार्गक्रमण झाले. यावेळी नळदुर्ग शहरांतील श्री खंडोबा देवाचे मानकरी, नागरीक व वारू मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री खंडोबा देवाला निरोप देण्यासाठी अणदुर येथील नागरीकांनी रस्त्याच्या दुतर्फा उभे राहुन देवाला निरोप दिला.पालखीतुन वाजत गाजत श्री खंडोबा देवाचे भल्या पहाटे नळदुर्ग शहरात आगमन झाले. यावेळी नळदुर्ग येथील शहर वासियांनी श्री खंडोबा देवाचे जोरदार स्वागत केले. यावेळी खंडोबा मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर आकर्षक रांगोळी काढुन महिलांनी भल्या पहाटे श्री खंडोबा देवाचे औक्षण करून देवाचे दर्शन घेतले. यावेळी रस्त्याच्या दुतर्फा नागरीक मोठ्या संख्येने खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी उभे होते.

श्री खंडोबा देवाचे नळदुर्ग (मैलारपुर) येथे आता पावणेदोन महिने वास्तव्य राहते. याठिकाणी दि.२४,२५ आणि २६ जानेवारी २०२४ रोजी श्री खंडोबाची यात्रा भरते. त्याचबरोबर आता दर रविवारी नळदुर्ग (मैलारपुर) येथील खंडोबा मंदिरात देवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी असते. खंडोबारायाच्या दर्शना साठी येणाऱ्या भक्तांची उपासमार होऊ नये म्हणून नळदुर्ग व अणदूर काही नागरीकांच्या वतीने भोजनाचे आयोजन केले जाते . दि.१४ डिसेंबर रोजी पहाटे ५ वा.श्री खंडोबा देवाचे नळदुर्ग (मैलारपुर) येथील खंडोबा मंदिरात आगमन झाले.

# पर्सन विथ डिसॅबिलिटीस आंतरराष्ट्रीय दिवस साजरा

ठाणे/मिलिंद जाधव : दिव्यांग व्यक्तींचा अंतरराष्ट्रीय दिवसानिमित्त, उम्मीद चाईल्ड डेव्हलपमेंट सेन्टरने रविवार, १० डिसेंबर २०२३ रोजी दादर पारसी कॉलनी जिमखाना मैदानावर 'फॅमिली डे' कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

मुंबईत पहिल्यांदाच असा सर्वसमावेशक कार्यक्रम झाला. दिव्यांग मुलांच्या कुटुंबांकडे



करमणुकीचे आणि विश्रांतीचे मर्यादित पर्याय आहेत कारण सर्व जागा सर्वसमावेशक नसतात. सतत असणाऱ्या जबाबदाऱ्यांमुळे पालक स्वतःसाठी वेळ काढू शकत नाहीत. या मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांच्या कुटुंबाच्या कल्याणासाठी करमणूक आणि विश्रांतीची सुविधा मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. उम्मीद 'फॅमिली डे' मध्ये दिव्यांग मुलांना आणि त्यांच्या कुटुंबियांना अडथळ्यांशिवाय सामुदायिक जागेत मजा अनुभवण्याची संधी मिळाली.

उम्मीद 'फॅमिली डे' कार्यक्रमाला ६०० हून अधिक लोक उपस्थित होते, ज्यात दिव्यांग मुलांच्या १८० कुटुंबांचा समावेश होता. सजवलेले स्टॉल, विविध करमणुकीचे खेळ आणि विविध ॲक्टिव्हिटीस यामुळे वातावरण चैतन्यमय झाले होते. या कार्यक्रमातील आकर्षणांमध्ये दिव्यांग मुले, त्यांचे कुटुंब आणि दिव्यांग व्यक्तींसोबत काम करणाऱ्या संस्थांच्या उत्पादनांचे स्टॉल, त्यांची हस्तकला, कौशल्य आणि स्वयंरोजगारासाठी आवेश दाखविण्याचा समावेश होता. खेळ आणि विविध ॲक्टिव्हिटीस चा आनंद लहान मुले आणि प्रौढांनी घेतला. संगीत आणि नृत्याने रंगमंच जिवंत झाला आणि दिव्यांग मुले आणि इतरांनी आपापल्या कलागुणांचे प्रदर्शन केले. एक मनमोहक ड्रम सर्कल सुध्दा कार्यक्रमाच्या ठिकाणी गुंजला, प्रत्येकाला प्रोत्साहन देऊन गाण्यासाठी आणि नृत्यासाठी सामील करण्यात आले. आत्म-नियमन करण्यासाठी एक शांत झोन ची सुद्धा व्यवस्था केली होती.

या कार्यक्रमाने समुदायाची आणि आपुलकीची भावना वाढवली, परंतु त्या दिवसाचे खरे आकर्षण म्हणजे दिव्यांग मुले आणि त्यांच्या कुटुंबियांनी स्वतःसाठी वेळ काढून आनंद व स्वातंत्र्य लुटण्याचा होता. दिव्यांग मुले आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी अशा अधिक समावेशक जागा उपलब्ध होण्याची नितांत गरज आहे. दरवर्षी किमान एकदा तरी अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्याची उम्मीदची अपेक्षा आहे. तथापि, आपण प्रत्येकजण आपापल्या पद्धतीने हे सक्षम करू शकतो, आपण दिव्यांग मुलांना आणि त्यांच्या कुटुंब्यांना आपल्या घरांमध्ये आणि समुदायांमध्ये समारंभासाठी आमंत्रित करा जेणेकरून त्यांना सहभागी होता येईल, आनंद घेता येईल आणि सर्वांसोबत मजा करता येईल. अपंगत्व जागरुकता आणि समाजात समावेशकतेला चालना देण्यासाठी हे खूप गरजेचे आहे.

**उम्मीद बद्दल** उम्मीद चाइल्ड डेव्हलपमेंट सेंटर (www.ummeed.org) ही एक छत्रछ संस्था आहे, ज्याची स्थापना २००१ मध्ये दिव्यांग असलेल्या किंवा दिव्यंगत्वाच्या धोक्यात असलेल्या मुलांना त्यांच्या पूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचण्यासाठी आणि समाजात समाविष्ट करण्यासाठी मदत करण्याच्या दृष्टीकोनातून करण्यात आली आहे. उम्मीदच्या टीममध्ये डेव्हलपमेंटल पीडियाट्रिशिअन, फिजिओ थेरपिस्ट, स्पीच थेरपिस्ट, ऑटिझम थेरपिस्ट , समुपदेशक, सोशियल सर्विस टीम ,स्पेशल एडयूकेटर , पालक आणि इतर तज्ञांचा समावेश आहे. या व्यतिरिक्त उम्मीद येथील फॅमिली रिसोर्स सेंटर (FRC) ची स्थापना २०२१ मध्ये करण्यात आली. दिव्यांग मुलांच्या कुटुंबांना पूर्ण सहभाग आणि सक्षमीकरणाच्या दिशेने त्यांच्या प्रवासात मदत करण्यासाठी व्यावसायिकांसोबत सहकार्याने काम करणाऱ्या पालकांनी चालवलेले हे एक अद्वितीय मॉडेल आहे.

FRC er frcummeed.org वर संपर्क साधता येईल.

# शरद पवार ही एक व्यक्ती नसून ती एक संस्था आहे : डॉ.राजाराम राठोड

पंढरपूर/प्रतिनिधीः देशातल्या सामान्यातल्या सामान्य माणसांशी संपर्क ठेवणे. समोरच्याचे ऐकून घेणे, एकदा भेटल्यानंतर त्यांच्याशी संबंध प्रस्थापित करणे, स्थानिक माणसांशी संवाद करणे आणि आपल्या डावपेचाचा प्रतिस्पर्ध्यास थांगपत्ता लागू न देणे ही शरद पवार यांच्या व्यक्तीमत्त्वाचे पैलू आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आयाम पाहिले तर शरद पवार ही एक व्यक्ती नसून ती एक संस्था आहे असे दिसते. असे प्रतिपादन परीक्षा नियंत्रक प्रोफे. डॉ. राजाराम राठोड यांनी केले. रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात संस्थेचे अध्यक्ष शरदचंद्रजी पवार यांच्या त्र्याऐंशीव्या वाढदिवसानिमित्त आयोजित अभीष्टचिंतन सोहळ्यात 'शरदचंद्र पवार यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व' या विषयावर प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, उपप्राचार्य डॉ भगवान नाईकनवरे, उपप्राचार्य प्रा. राजेश कवडे, अधिष्ठाता डॉ बाळासाहेब बळवंत, पर्यवेक्षक प्रा. युवराज आवताडे व कार्यालयीन प्रमुख प्रभाकर पारधी आदी मान्यवर उपस्थित होते.



प्रोफे. डॉ. राजाराम राठोड पुढे म्हणाले की, शरद पवार यांच्याकडे केवळ एक राजकारणी म्हणून आपण पाहिले तर त्यांचे व्यक्तिमत्त्व आपणास समजू शकणार नाही. त्यांना लाभलेला राजकारणाचा आणि विचाराचा वारसा हा त्यांच्या आई शारदाताई पवार यांच्याकडून लाभलेला आहे. लहानपणापासूनच त्यांच्या घरी असलेले राजकीय आणि सामाजिक सौहार्दाचे वातावरण, घरातील समाजवादी विचारसरणी, सत्यशोधकी चळवळीचा वारसा यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व घडत गेले. शरद पवार यांनी लिहिलेल्या 'लोक माझे सांगाती' या आत्मचरित्रातून त्यांचे व्यक्तिमत्त्व आपणास समजू शकते. साधी राहणी, सातत्यपूर्ण कार्यमग्नता, कामाचा पाठपुरावा, लोकसंपर्क यागोष्टीमुळे ते यशस्वी झालेले दिसतात.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे म्हणाले की, शरद पवार यांनी देशाच्या कृषीमंत्री पदावर असताना केलेले कार्य देशाला दिशादर्शक ठरणारे आहे. रयत शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना संगणकीय शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी प्रत्येक शाळेवर संगणक उपलब्ध करून दिले. व्यावसायिक महाविद्यालये सुरु करण्याऐवजी गुणवत्तापूर्ण शिक्षण सर्वांना मिळावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांच्याच मार्गदर्शनाने महाराष्ट्रात रयत शिक्षण संस्थेने नावलौकिक प्राप्त केला आहे.यावेळी शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त घेण्यात आलेल्या निबंध व वक्तृत्व स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. महाविद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बजरंग शितोळे यांनी केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. हेमंत गव्हाणे यांनी केले. या कार्यक्रमास सिनिअर, ज्युनिअर, व्यवसाय अभ्यासक्रम विभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक आणि पालक बहुसंख्येने उपस्थित होते. शेवटी उपस्थितांचे आभार प्रा. राहुल मुसळे यांनी मानले.

# आ.समाधान आवताडे यांच्या वाढदिवसानिमित्त बालेवाडी पशुवैद्यकीय शिबिर संपन्न




पंढरपूर /प्रतिनिधी : मंगळा तालुका पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाचे समाधान आवताडे यांच्या वाढदिवसाच्या गुरुवार दिनांक १४ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ठीक आठ वाजता मौजे बालेवाडी ग्रामपंचायत पतीने जनावरांचे बंधन व निवारण व औषधोपचार शिबिर तसेच मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण ही करण्यात आली या शिबिरामध्ये जनावरांना रोग प्रतिबंधक रोग प्रतिबंधक लस वंदत्व निवारण औषध उपचार करण्यात आले

माझ्यावर न येणारे तनवारे व गाभण न राहणारी जनवारे अशा जनावरांना या शिबिरात औषध उपचार करण्यात आली. या शिबिरात शेतकऱ्यांनी मोठा सहभाग नोंदवला आहे हे शिबिर यशस्वी करण्यासाठी ड्रॉ रवींद्र बंडगर पशुधन विकास अधिकारी पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी एक मरवडे ड्रॉ अजित गायकवाड ग्रामपंचायत सरपंच ड्रॉ श्रीकांत दवले उपसरपंच लिंगेश्र्वर माळी ग्रामसेवक दत्तात्रेय गायकवाड ग्रामपंचायत सदस्य हरिभाऊ गवळी आबा गवळी माजी उपसरपंच नितीन गवळी माजी ग्रामपंचायत सदस्य दिलीप शिवशरण महादेव भरकवडे विजय बाबर आप्पा घाडगे निखिल भोरकडे आप्पा बबन गवळी महादेव वाघमारे तसेच गावातील पंचक्रोशीतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिराच्या सुरुवातीला आ समाधान आवताडे यांनी बालेवाडी ग्रामपंचायतला मोठ्या प्रमाणात आर्थिक निधी उपलब्ध करून दिल्याने गावचा विकास कामात कायापालट होण्यास मदत होणार आहे यावेळी अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून आमदार समाधान आवताडे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या शिबिर यशस्वी केल्या बद्दल ड्रॉ रवींद्र बंडगर यांनी सरपंच ड्रॉ श्रीकांत दवले व बालेवाडी ग्रामस्थांच्या वतीने स्वागत व सत्कार करण्यात आला आमदार समाधान आवताडे यांच्या वाढदिवसानिमित्त रवींद्र बंडगर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले ड्रॉ बंडगर यांनी बालेवाडी ग्रामपंचायत जनावरांच्या शिबिरासाठी एक खोडा उपयोग करून दिला व त्याबद्दलही त्यांचे बालेवाडी ग्रामस्थांच्या वतीने कौतुक होत आहे

# स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला युजीसी कडून स्वायत्तता (ऑटोनॉमस) दर्जा प्रदान!

## स्वेरीच्या शिरपेचात मानाचा तुरा!

पंढरपूर/प्रतिनिधीः 'गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट तथा स्वेरी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूरला देशातील शैक्षणिक क्षेत्रातील महत्वपूर्ण असलेला 'स्वायत्त' दर्जा अर्थात 'ऑटोनॉमस दर्जा' प्राप्त झाला आहे. हा दर्जा शै. वर्ष २०२४-२०२५ पासून शै. वर्ष २०३३-२०३४ अशा एकूण दहा वर्षांसाठी असणार आहे.युजीसी (युनिव्हर्सिटी ग्रँटस कमिशन) व पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याकडून तसे पत्र महाविद्यालयास नुकतेच प्राप्त झाले आहे.'अशी माहिती स्वेरीचे संस्थापक सचिव व इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी दिली.अलीकडेच 'नॅक'चया त्रिसदस्यीय समितीने महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला ४ पैकी ३.४६ सीजीपीए सह 'ए प्लस' ही ग्रेड दिलेली होती. ही ग्रेड देण्याच्या अनुषंगाने त्यांनी महाविद्यालयातील सर्व पायाभूत शैक्षणिक व भौतिक सुविधा, अध्ययन-अध्यापन पद्धती, विद्यार्थी पूरक सुविधा, महाविद्यालयाची शैक्षणिक उद्दीष्टे, अभ्यासक्रमाचा दर्जा व त्याची काटेकोर अंमलबजावणी, विद्यार्थ्यांची गुणवत्ता, शिक्षकांची गुणवत्ता, कॅम्पस प्लेसमेंट, संशोधन तसेच यापूर्वी मिळालेल्या मानांकनापासून ते आतापर्यंत महाविद्यालयाने केलेली प्रगती व इतर महत्वपूर्ण बाबींची शहानिशा केली होती. ४ पैकी ३.४६ एवढ्या स्कोअर सह 'ए प्लस' ग्रेड मिळवणारे स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर हे पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील एकमेव अभियांत्रिकी महाविद्यालय ठरले आहे. एखाद्या महाविद्यालयास 'ऑटोनॉमस' दर्जा प्राप्त होण्यासाठी नॅक कडून किमान 'ए' ही ग्रेड मिळणे आवश्यक असते.

'नॅक'चे 'ए प्लस' मानांकन मिळाल्यामुळे स्वेरीमधील शिक्षणाच्या दर्जावर शिक्कामोर्तब झाले होते. या पूर्वी महाविद्यालयाला नॅकचे एकदा तर महाविद्यालयातील पात्र अभ्यासक्रमांना 'एनबीए' चे दोनदा मानांकन मिळालेले आहे तसेच एन.आय.आर. एफ या राष्ट्रीय पातळीवरील रँकिंग मध्ये १५१- ३०० च्या बँड मध्ये स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ने स्थान मिळवले आहे. नुकत्याच मिळालेल्या या स्वायत्ततेच्या माध्यमातून महाविद्यालयाच्या उच्च शैक्षणिक दर्जावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे तसेच या दर्जामुळे विद्यार्थी केंद्रित अभ्यासक्रम ठरवणे, परिणामकारक परीक्षा पद्धती राबवणे आदी बाबतीत महाविद्यालयास स्वायत्तता प्राप्त होणार आहे. स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला हा दर्जा मिळण्यामध्ये स्वेरीत वापरल्या जाणाऱ्या 'आर-वर्क' या ईआरपी प्रणालीचा सिंहाचा वाटा आहे. 'नॅक' साठी आवश्यक असणारे सर्व विभागांचे सर्व रिपोर्ट्स या प्रणालीच्या माध्यमातून लीलया पद्धतीने तयार होतात आणि सर्व माहितीचे संकलन एकाच ठिकाणी होत असल्याने महाविद्यालयांना या प्रणालीचा खूपच मोलाचा फायदा होतो.

भाभा अणुसंशोधन केंद्राच्या माध्यमातून 'स्वेरी' मध्ये 'ग्रामीण मानव संसाधन विकास केंद्र' (आर.एच.आर.डी. एफ.) ची निर्मिती ज्येष्ठ अणूशास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ.अनिल काकोडकर यांच्या हस्ते उदघाटन करून करण्यात आली होती. या केंद्राच्या माध्यमातून पुढे समाजोपयोगी आणि ग्रामीण उद्योजकता वाढविण्याच्या हेतूने तसेच उपयोगी तंत्रज्ञान ग्रामीण भागातील लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आले. 'नॅशनल नॉलेज नेटवर्क'च्या माध्यमातून स्वेरीमध्ये उत्तम दर्जाची व हाय स्पीड इंटरनेट सुविधा उपलब्ध करण्यात आली. सन २०१६, २०१८ व २०२० व २०२२ या चार वर्षी 'टेक्नो-सोसायटल' या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या माध्यमातून समाजाशी निगडित असलेल्या समस्या सोडवण्यासाठीआणि ग्रामीण भागातील तंत्रज्ञानाला चालना मिळण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरील परिसंवाद आयोजित करण्यात आले होते.

आजपर्यंत जवळपास ३३ संशोधन प्रकल्पांमधून सुमारे ४४.३४ कोटी इतका संयुक्त संशोधन निधी महाविद्यालयास मंजूर झाला आहे. या निधीच्या माध्यमातून 'स्वेरी' मध्ये विविध अद्ययावत प्रयोगशाळांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामध्ये ॲडव्हान्स्ड मॅन्युफॅक्चरिंग लॅब, चेन टेस्टिंग लॅब, व्हायब्रेशन अनालिसिस लॅब, एन.डी. टी. लॅब, लोडींग फ्रेम फॅसिलिटी, ॲडव्हान्स्ड डिझाइन अँड सिम्युलेशन लॅब, अँटेना डिझाइन लॅब इ. चा समावेश आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील सुमारे ३५ संस्थांसोबत सामंजस्य करार करण्यात आले असून त्याद्वारे विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षकांच्या बौद्धिक विकासास आणि तांत्रिक कौशल्य वाढीस चालना मिळत आहे. 'स्वेरी'तील एकूण ३२ प्राध्यापक पीएच.डी. धारक असून आणखी २८ प्राध्यापक पीएच.डी. पुर्ण करण्याच्या मार्गावर आहेत. स्वेरीमध्ये विद्यार्थ्यांसाठी आणि शिक्षकांसाठी असणाऱ्या संशोधनपूरक वातावरणामुळे आणि प्रोत्साहनपर धोरणामुळे गेल्या पाच वर्षात ८०० पेक्षा जास्त संशोधनपर लेख प्रसिद्ध झाले आहेत. स्वेरीतील टेक्नो-सोसायटल च्या शोधनिबंधाना आंतरराष्ट्रीय 'स्कोपस' चा दर्जाही प्राप्त झाला आहे. याच संशोधनाच्या माध्यमातून अभियांत्रिकी व तंत्रज्ञानाशी संबंधित सुमारे ४४ पुस्तके आजपर्यंत प्रकाशित झाली असून ४७ पेटंट्स देखील दाखल करण्यात आले आहेत. गेली सलग दोन वर्षे स्वेरीतील सर्व अभ्यासक्रमांना १००% प्रवेश झाले आहेत. स्वेरी मध्ये विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सर्व सोई सुविधांसह फ्लड लाईट सुविधा असणारे सुमारे चार एकरांचे भव्य क्रीडांगण आहे. सांस्कृतिक क्षेत्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आवश्यक सुविधा व उपक्रम स्वेरीने राबविले आहेत. आतापर्यंत पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या युवा महोत्सवाचे तीन वेळा यशस्वी आयोजन महाविद्यालयाने करून दाखवले आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागात तसेच वारीकालात सेवा देण्याचे भरीव काम महाविद्यालयाकडून दरवर्षी होते. या सर्व बाबींमुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक दर्जामध्ये भर पडली आहे. आज अमेरिकेतील एक विद्यार्थी स्वेरीमध्ये संशोधन कार्य करत आहे. महाविद्यालयास नॅक सोबतच टी.सी.एस (टाटा कल्संटन्सी सर्विसेस), आय.ई.आय. (इन्स्टिटयूशन इंजिनिअर्स ऑफ इंडिया) तसेच आय.एस.ओ. ९००१:२०१५ व यु.जी.सी.चे २ एफ व १२ बी प्रमाणपत्र मिळाले आहे तसेच अकॅडेमिक अँड अडमिनिस्ट्रेटिव्ह ऑडिट मध्ये स्वेरी अभियांत्रिकी महाविद्यालयाला 'ए प्लस प्लस' हे मानांकन मिळाले आहे. स्वेरीचे संस्थापक सचिव व इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, स्वेरीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सर्व विश्र्वस्त यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार व आय.क्यू.ए.सी. व स्वायत्तता समन्वयक डॉ. संदीप वांगीकर, कॅम्पस इन चार्ज डॉ. एम.एम. पवार, सर्व अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, स्वेरी परिवारातील व अभियांत्रिकी महाविद्यालयातील सर्व शिक्षक वशिक्षकेतर कर्मचारी यांनी हा दर्जा प्राप्त करण्यासाठी परिश्रम घेतले. या यशाबद्दल स्वेरीचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, तसेच संस्थेचे विश्र्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी सर्वांचे अभिनंदन केले. कॉलेजचे इन्फ्रास्ट्रक्चर, कल्चर, कॅम्पस प्लेसमेंट, अल्पावधीत निर्माण झालेले संशोधनाचे वातावरण, विद्यापीठात सर्वोच्चस्थानी असलेले शैक्षणिक निकाल आणि याच्या पंक्तीला 'नॅक' चे 'ए प्लस' हे मानांकन आणि त्यायोगे मिळालेली स्वायत्तता यामुळे विद्यार्थ्यांबरोबरच पालक वर्गात देखील आनंदाचे, उत्साह व समाधानाचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

